RNI No. MAHBIL/2012/48433
www.dgps.maharashtra.gov.in.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# भाग एक–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - ७, अंक - ८ ] गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी २२ - २८, २०१८ / फाल्गुन ३ - ९, शके १९३९ [ पृष्ठे १४८

## प्राधिकृत प्रकाशन

## शासकीय / संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

**विभागीय आयुक्त यांजकडून**

**पुणे विभाग, पुणे**

*भूसंपादन अधिनियम, १८९४ मधील कलम ४८ (१) खालील अधिसूचना*

*अधिसूचना*

क्रमांक भूसं/एसआर-४८ (१)/०१/२०१८.--ज्याअर्थी, भूमी संपादन अधिनियम, १८९४ अन्वये (यापुढे ज्याचा "संपादन अधिनियम" असा उल्लेख केला आहे) कलम ६ खालील अधिसूचना क्रमांक पीएलबी-२/कावि-४८०/२०१३, दिनांक २६ नोव्हेंबर २०१३ अन्वये पृष्ठ १२५ वर अधिसूचित करणेत आली आहे की, या ठिकाणी सोबत नमूद केलेल्या अनुसूचीच्या स्तंभ २ व ३ मध्ये वर्णन केलेल्या जमिनी (यापुढे त्यांचा "उक्त जमिनी" असा उल्लेख केला आहे) आरक्षण क्रमांक ४, श्री क्षेत्र आळंदी तीर्थक्षेत्र विकासासाठी वाहनतळ आरक्षण या सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन करण्याकरिता अधिसूचना करणेत आली व त्याबाबत अंतिम निवाडा क्रमांक सजरो/भूसं/एसआर-३/२०१३, दिनांक २७ ऑक्टोबर २०१५ अन्वये जाहीर करणेत आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, शासन निर्णय क्रमांक टीपीएस-१८१५/२६/प्र. क्र. २७३/१५/नवी-१३, दिनांक १८ सप्टेंबर २०१७ अन्वये आळंदी शहराच्या दुसऱ्या सुधारित मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्रमांक ४, वाहनतळ हे आरक्षण वगळून स. नं. २२० व २२२ खालील जागा निवासी विभागात समाविष्ट करणेबाबतच्या महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ *(१ कक) क* अन्वये अधिसूचना प्रसिद्ध करणेत आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी, पुणे यांनी पत्र क्रमांक पीएलसी/कावि-१९२३/२०१७, दिनांक ८ नोव्हेंबर २०१७ अन्वये अधिसूचित केलेली मिळकत भूमी संपादन अधिनियम, १८९४ मधील कलम ४८ *(१)* अन्वये संपादनातून वगळणेबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे व त्यास आळंदी नगर परिषद, आळंदी देवाची, तालुका खेड, जिल्हा पुणे यांनी त्यांचेकडील ठराव क्रमांक ७६, दिनांक १६ सप्टेंबर २०१७ अन्वये सहमती दर्शविलेली आहे तसेच उपविभागीय अधिकारी खेड, खेड उपविभाग, खेड (राजगुरूनगर) यांनी आरक्षित जागेचा ताबा घेतलेला नाही असा अहवाल जा. क्र. सखरो/कावि-४७२/२०१७, दिनांक १३ ऑक्टोबर २०१७ अन्वये सादर केलेला आहे.

त्याअर्थी, भूसंपादन अधिनियम, १८९४ मधील कलम ४८ *(१)* मधील तरतुदीचा वापर करून मी, चंद्रकांत दळवी, विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे असे जाहीर करीत आहे की, सोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ २ मध्ये नमूद केलेल्या स. नं. पैकी स्तंभ ४ मध्ये वर्णन केलेले क्षेत्र संपादनातून वगळणेत आलेले आहे.

संपादनातून वगळणेत आलेल्या जमिनी दर्शविणारा नकाशा उपविभागीय अधिकारी, खेड उपविभाग, खेड (राजगुरूनगर) यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहण्याकरिता उपलब्ध आहेत.

ज्या सार्वजनिक प्रयोजनातून वगळण्यात आली ते संपादनाचे प्रयोजन.--श्री क्षेत्र आळंदी तीर्थक्षेत्र विकासासाठी वाहनतळ आरक्षण क्रमांक ४ (चाकण रस्त्यालगत).

अनुसूची

जिल्हा पुणे, तालुका खेड, मौजे आळंदी

| अ. क्र. | सर्व्हे नंबर | निवाड्याप्रमाणे संपादन करणेत आलेले क्षेत्र | संपादनातून वगळणेचे क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | २ | ३<br>हे.आर/चौ.मी. | ४<br>हे.आर/चौ.मी. |
| १ | २२०/४-ब पैकी | ०.०१.०६ | ०.०१.०६ |
| २ | २२०/५+६/१ पैकी | ०.०६.९३ | ०.०६.९३ |
| ३ | २२०/५+६/२ पैकी | ०.००.९० | ०.००.९० |

चंद्रकांत दळवी,
विभागीय आयुक्त,
पुणे विभाग, पुणे.

पुणे, २ फेब्रुवारी २०१८.

---

## जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख यांजकडून

वाचा.-- (१) महाराष्ट्र शासन राजपत्र भाग चार, दिनांक २१ ऑगस्ट २०१५, सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५.

(२) महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्रमांक संकिर्ण-२०१६/प्र. क्र. १९४/ल-१, दिनांक २७ जुलै २०१६.

(३) या कार्यालयाकडील अधिसूचना क्रमांक भू-३/वि.नों.क्र. २०५/म.लो.ह.अ. २०१५/२०१६/पुणे, दिनांक ४ ऑगस्ट २०१६.

*दुरुस्ती अधिसूचना*

क्रमांक भू-३/वि.नों.क्र. २०५/म.लो.ह.अ. २०१५/२०१६.--विषयांकितबाबत महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१) च्या कलम ३ *(१)* अन्वये या कार्यालयाकडील अधिसूचना क्रमांक भू-३/वि.नों.क्र. २०५/म.लो.ह.अ. २०१५/२०१६, दिनांक ४ ऑगस्ट २०१६ मध्ये अ. क्र. ४ (अ) मध्ये फेरफार नोंदी विवादग्रस्त नसल्यास त्याचा कालावधी ३० दिवस असा नमूद आहे. तसेच जमाबंदी आयुक्त, पुणे कार्यालयाकडील नागरिकांची सनद यामध्येही फेरफार नोंदी विवादग्रस्त नसल्यास त्याचा कलावधी ३० दिवस असा नमूद आहे.

नागरिकांना "ईज ऑफ डुईंग बिजनेस" अंतर्गत तत्पर सेवा देणेकरिता सदर कालावधी कमी करण्याबाबतची बाब इकडील कार्यालयाच्या विचाराधीन होती. सबब, दिनांक ४ ऑगस्ट २०१६ रोजीची अधिसूचना व नागरिकांची सनद यामध्ये नमूद फेरफार नोंदी विवादग्रस्त नसल्यास त्याचा कालावधी "३० दिवस" ऐवजी "२५ दिवस" करण्यात येत आहे.

दिनांक ४ ऑगस्ट २०१६ रोजीची अधिसूचना व नागरिकांची सनद यामधील उर्वरित सर्व मजकूर/तरतुदी कायम समजणेत याव्यात.

एस. चोक्कलिंगम,
जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख ,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे, ११ जानेवारी २०१८.

---

## जमाबंदी आयुक्त आणि उपसंचालक, भूमी अभिलेख यांजकडून

वाचा : (१) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय क्रमांक आरस्थापना-१०९३/प्र. क्र. १९/ल-१, दिनांक १८ ऑगस्ट १९९४.

(२) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे यांचेकडील अधिसूचना क्रमांक एस. व्ही. सी. आर. ४३२४/स-४/१९९४, दिनांक २३ सप्टेंबर १९९४.

(३) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे यांचेकडील अधिसूचना क्रमांक गावठाण/अधिसूचना/प.नो. ५५/२०१७, दिनांक ५ ऑगस्ट २०१७.

(४) उपसंचालक, भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे यांचेकडील पत्र क्रमांक न. भू. २/गां. परि.प्र./सांगली/कावि/१७/१९८, दिनांक ११ जानेवारी २०१८.